सामना

II पुणे शहर

पुणे, शुक्रवार, दि. ५ ऑक्टोबर २०१८

# 'फ्लाइंग यंगस्टर्स' गटामार्फत स्वच्छता अभियान

पंख व क्विक हिल फाउंडेशनतर्फे शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू विद्यालयातील विद्यार्थ्यांनी फ्लाइंग यंगस्टर्स गटामार्फत वडारवाडी येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्त्री शिक्षणावर पोवाडाही सादर केला. पंख संस्थेच्या समुपदेशकांनी स्वच्छतेवर आधारित पथनाट्य सादर केले. याप्रसंगी कैलास काटकर, क्विक हिल फाउंडेशन डायरेक्टर व उपाध्यक्षा क्विक हील मानव संसाधन विभाग अनुपमा काटकर, महापौर मुक्ता टिळक, नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, नगरसेवक सिद्धार्थ शिरोळे, अभिनेते सिद्धेश्वर झाडबुके, आरोग्य निरीक्षक खरात मॅडम, अजय शिर्के, स्मिता आपटे, मैथिली बंडी, राम म्हेत्रे, काळूराम पवार, मुख्याध्यापिका जयश्री पाटील, शंकर शेटे, शारदा शेटे उपस्थित होत्या. सूत्रसंचालन कल्याणी भाबड यांनी केले. अजय शिर्के यांनी आभार मानले.

